ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख २३ डिसेंबर, १९५३ | अंक ४८

## विविध माहिती

**भारतामधील वनस्पतींचा अभ्यास**—डब्लिनच्या ट्रिनिटी कॉलेजमधील वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक डॉ. डेव्हिड हे ऑस्ट्रेलिआला जातांना वाटेंत मुंबईला उतरले होते. उष्ण देशांतील वनस्पतींचा आपणास अभ्यास करावयाचा आहे, असें त्यांनीं सांगितलें. मुंबईच्या मुक्कामांत ते एलेफंटा बेटावर जाऊन आले व त्यांनीं तेथील कांहीं वनस्पतींचे रंगीत फोटोहि घेतले.

**फौन्टनपेन्सचा कारखाना**—ब्रिटनमधील एका कारखान्याच्या साह्यानें बंगलोरजवळ फौटनपेन्स व त्यांची शाई तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखान्याचे सर्वच्या सर्व म्हणजे ५ लाख रुपयांचें भांडवल देशीच राहील. ब्रिटिश कारखान्यातर्फे फक्त तांत्रिक मदत देण्यांत येईल.

**इंडोनेशिआंत भारतीय चित्रपट**—इंडोनेशिआंत येणाऱ्या परदेशीय आशिआई राष्ट्रांच्या सर्व चित्रपटांपेक्षा भारतीय चित्रपटांना अधिक मागणी आहे, असें समजतें. गेल्या वर्षी इंडोनेशिआंत २० भारतीय चित्रपट दाखविण्यांत आले. त्यापैकीं कांहीं चित्रपट एकाच चित्रगृहांत कित्येक आठवडे चालले होते.

**तांदुळाच्या संचयाला पंजाबची मदत**—पंजाब सरकारनें मध्यवर्ती सरकारच्या तांदुळाच्या पुरवठ्याला आणखी १५,००० टन तांदूळ देण्याचें मान्य केलें आहे. हा तांदूळ धरून पंजाबकडून आतांपर्यंत चालू हंगामांत ९०,००० टन तांदूळ पुरविण्यांत आला आहे. पंजाबांत तांदुळाची सरकारी खरेदी यंदा गेल्या वर्षीपेक्षा बरी होत आहे, असें समजतें.

**बडोद्याजवळ सिमेंटचा कारखाना**—बडोद्याजवळ एका झेकोस्लोव्हाकिअन कारखान्याच्या मदतीनें सिमेंटचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं ३ ते ४ कोटी रुपयांचें भांडवल जमविण्यांत येणार आहे.

**बिहारमध्यें युरेनिअमचा आढळ**—बिहारमधील बऱ्याच मोठ्या भूभागांत युरेनिअममिश्रित माती सांपडल्याचें लोकसभेंत सांगण्यात आलें. ही माती काय दर्जाची आहे आणि तीपासून किती युरेनिअम निघूं शकेल, ह्याविषयीं सध्या तपासणी चालू आहे.

**अभिजात ग्रंथांचीं भाषांतरें**—मध्यपूर्वेंतील देशांत प्रसार करण्यासाठी म्हणून भारतीय सरकार अभिजात भारतीय ग्रंथांच्या अरेबिअन आवृत्त्या काढणार आहे. प्रथम शाकुंतलाचें पुस्तक काढण्यांत येणार आहे. नंतर हळूहळू महाभारत, भगवद्गीता, रामायण, नलदमयंती, इत्यादि पुस्तकांच्या आवृत्त्या काढण्यांत येतील. वदील बुस्तानी ह्या अरेबिअन कवीनें वरील ग्रंथांच्या केलेल्या भाषांतराचे हक्क सरकारनें मिळविले आहेत.

**मृत माणसाच्या डोळ्यांना मागणी**—रस्त्यावरील अपघातांत मृत झालेल्या माणसांचीं बुबुळें मिळविण्यासाठी फ्रेंच डॉक्टर्स प्रयत्न करीत आहेत. कांहीं प्रकारचे नेत्रदोष दूर करण्याच्या कामीं त्यांचा उपयोग चांगला होतो. बुबुळांचें कलम यशस्वी होण्यासाठी तीं नुकत्याच मेलेल्या माणसाचीं असावीं लागतात. पण फ्रान्समधील प्रचलित कायद्याप्रमाणें अपघातांत मृत्यू पावलेल्या माणसांचीं बुबुळें काढतां येत नाहींत.

**लखीमपूर भागांत उत्तम प्रतीचा कोळसा**—प. बंगालमधील सुबनसिरी आणि जयकोल नद्यांच्या उगमाजवळच्या भागांत उत्तम प्रतीचा कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासारखा आहे असें समजतें. ह्या नद्यांच्या पाण्यांतून खनिज तेलांचे तवंगहि कधीं कधीं दृष्टीस पडतात अशी वार्ता आहे.

**झेकोस्लोव्हाकिआचें प्रतिनिधी मंडळ**—झेकोस्लोव्हाकिआचें एक व्यापारी मंडळ नुकतेंच सीलोनला रवाना झालें. मंडळांत ५ प्रतिनिधी असून त्यापैकीं तिघेजण एका प्रमुख कारखान्यातर्फे आलेले आहेत. सीलोनमध्यें कांहीं दिवस राहून मंडळ भारताला येणार आहे. सीलोन आणि भारत ह्यांच्या दरम्यान व्यापारी संबंध स्थापन करण्याचा त्याचा हेतु आहे.

**अपंगांना काम देणारी कंपनी**—अपंगांना काम देणारी एक कंपनी ब्रिटनमध्यें आहे. गेल्या वर्षी तिच्या व्यवहारांत २३,८०,४०० पौंडांचें नुकसान आलें. ह्या कंपनीचें नांव रेमप्लॉय लिमिटेड असून ती गेल्या महायुद्धाच्या अखेर मजूर खात्यानें स्थापन केलेली आहे. युद्धांत अपंग झालेल्या माजी सैनिकांना व नागरिकांना काम देण्यासाठीच तिचा जन्म झाला.

**पडीक जमीन उपयोगांत आणणार**—मद्रास सरकार सालेम जिल्ह्यांतील १ लाख एकर पडीक जमीन सेंट्रल ट्रॅक्टर ऑर्गनायझेशनच्या मदतीनें लावडीसाठी योग्य करण्याचा विचार करीत आहे. ह्याबाबत भारतीय सरकारशीं राज्य सरकारचा विचारविनिमय चालू आहे. ही जमीन लागवडीखालीं आणल्यास तींत बागाईत आणि जिराईत अशीं दोन्हीं पिकें काढतां येण्यासारखीं आहेत.

**सिगारेट्सचा खप घटला**—अमेरिकेंतील सिगारेट्सचा खप गेल्या २० वर्षांत प्रथमच घटत चालला आहे. बेसुमार धूम्रपान आणि फुफ्फुसाचा कॅन्सर ह्यांचा परस्पर संबंध असल्याचें डॉक्टरांनीं जाहीर केल्यामुळें खप घटला असें कारखानदारांचें म्हणणें आहे. केमिस्टांच्या दुकानांतून सध्या धूम्रपान थांबविण्याच्या गोळ्यांना मात्र खूप मागणी आहे. त्याचप्रमाणें 'सिगारेट कशी सोडावी' ह्या पुस्तकाचा खपहि सपाटून वाढला आहे.

### दि ईस्टर्न कॉ-ऑपरेटर—नवें इंग्रजी साप्ताहिक

"भारतांतील व पूर्वेकडील सहकारी चळवळीचें मुखपत्र" असें वर्णन वरील साप्ताहिकाच्या नांवाखाली संपादकांनीं दिलेलें आहे. "फेब्रुवारी, १९५२ मध्यें मुंबई येथें पहिली अखिल भारतीय सहकारी काँग्रेस भरली त्यावेळीं १,२४,००,००० सभासद असलेल्या १,७०,००० सहकारी सोसायट्यांच्या प्रतिनिधींना सहकाराचा संदेश खेडोंपाडीं पोंचविण्याचें साधन उपलब्ध नसल्याचा अनुभव आला. सहकारी चळवळीला एक प्रभावी मुखपत्र हवें, असें मत व्यक्त करण्यांत आलें. मासिकें किंवा त्रैमासिकें ह्यापेक्षा दैनिक किंवा साप्ताहिक हींच अधिक उपयुक्त ठरणारीं आहेत. सहकारी चळवळीचे पाईक, ह्या नात्यानें आम्हीं काँग्रेसला आलेल्या प्रतिनिधींना एक सर्क्युलर पत्र पाठवून दोन साप्ताहिकें (एक इंग्रजी व एक हिंदी) प्रसिद्ध करण्याची तयारी दर्शविली. त्या दोघांचेंहि नांव "जनशक्ति" असावें असें आम्हीं सुचविलें. आम्हांला अपेक्षेपेक्षा चांगलें उत्तेजन मिळालें, आणि कांहींनीं उपयुक्त सूचनाहि केल्या. त्यापैकीं दोन आम्हीं तात्काळ पत्करल्याः—(१) इंग्रजी साप्ताहिकाचें नांव "दि ईस्टर्न को-ऑपरेटर" ठेवावें (२) हिंदी साप्ताहिकाचें नांव "सहकारी जनशक्ति" असावें. साप्ताहिकें दिल्ली ऐवजीं मुंबई येथें प्रकाशित केलीं जावींत. प्रथम इंग्रजी साप्ताहिकाच्या प्रकाशनास २६ जानेवारी १९५४ रोजीं प्रजासत्ताक दिनीं प्रारंभ होणार आहे." नवभारत प्रकाशन मंदिराच्या मालक, श्री. ज्वालाराणी भारयीय ह्यांनीं "दि ईस्टर्न को-ऑपरेटर" विषयीं वरीलप्रमाणें निवेदन केलें आहे.

ह्या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक श्री. गोविंद कृष्ण हे आहेत. वार्षिक वर्गणी १२ रु. असून तिचेमध्यें आणि सहामाही व तिमाही वर्गणींत भारतांतील सहकारी चळवळीच्या सुवर्ण ज्युबिलीनिमित्त २६ जानेवारी, १९५४ पर्यंत २५% सवलत देण्यांत येणार आहे.

---

### श्री. शिंगरे ह्यांची सल्लागार कमिटीवर नेमणूक

मुंबई सरकारचे पुरवठा खात्याचा ठराव १८—१००१९ फोर्थ-ह ता. ८—१२—५३ प्रमाणें बॉंबे स्टेट कोल अँड कोक ॲडव्हायसरी कमिटीवर कोल व कोक मर्चंट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. म. व्यं. शिंगरे यांची कोल व कोकचे डीलर्सचे प्रतिनिधी म्हणून नेमणूक झाली आहे.

---

### राग कां नाहीं येणार ?

"माझे ४,००० डॉलर तुम्हांला देतां येत नाहींत; आम्हीं मात्र कोट्यवधि रुपये किंमतीचा गहूं एक पैहि न घेतां तुमच्या घरीं आणून पोंचता केला" असे मोठ्या रागाचे उद्गार एका अमेरिकन व्यापाऱ्यानें कराची येथें पाकिस्तानच्या व्यापार-खात्याचथा कचेरींत काढले. पाकिस्तानांतून अमेरिकेकडे निर्गत केलेली लोकर वाईट दर्जाची निघाली, म्हणून नुकसानभरपाई-दाखल हे ४,००० डॉलर त्या अमेरिकन व्यापाऱ्याला वसूल करावयाचे होते. व्यापारखात्याच्या अधिकाऱ्यास ह्या "उद्दाम-पणाचा" राग आला, परंतु नुकसानभरपाई मात्र त्यानें तात्काळ देवविली!


## बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव:—बँक १ ते ३ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे, मॅनेजर.



## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सेनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे घरक, सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगां-वरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गा-ड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

# अर्थ

बुधवार, ता. २३ डिसेंबर १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी वृत्तपत्रांतील परदेशी बातम्यांचें अनिष्ट प्रमाण

भारतांतील वृत्तपत्रांत, इतर देशांतील वृत्तपत्रांच्या मानानें, परदेशी घडामोडींची माहिती फारच जास्त असते, असें इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिटयूटनें जमविलेल्या आंकडेवारीनें स्पष्ट केलें आहे. जाहिराती सोडल्या म्हणजे उरलेल्या जागेपैकी १२.५% जागा, देशी भाषेंतील वृत्तपत्रांत परदेशी बातम्यांनीं व्यापलेली असते; इंग्रजी वृत्तपत्रांत हें प्रमाण २२% च्या वर जातें. बातम्यांत चित्रें, संपादकीय मजकूर, इत्यादींचाहि समावेश आहे. संपादिकाला जागतिक घडामोडींबद्दल विशेष आस्था वाटते, त्याचा हा परिणाम आहे असें म्हणणें चुकीचें होईल. परदेशांत बातम्या गोळा करण्याच्या व त्या वृत्तपत्रांना वाटून देण्याच्या जशा कार्यक्षम संघटना आहेत तशा हिंदी स्थानिक बातम्याबाबत नाहींत आणि त्यांत सुधारणा होईपर्यंत परदेशी बातम्यांचा सुकाळ असणें स्वाभाविक आहे, असें इन्स्टिटयूटचें म्हणणें आहे.

भारतांतील वृत्तपत्रें परदेशी घडामोडींची माहिती छापतात, ती भारतीय पत्रकारांनीं पुरविलेली नसते, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पाश्चात्य देशांतून वहाणाऱ्या आणि भारतांतील इंग्रजी वृत्तपत्रांत छापलेल्या बातम्यांपैकी २९.७% बातम्या ग्रेट ब्रिटन प्रभृति पाश्चात्य युरोपसंबंधीं असतात. अमेरिकन बातम्यांचें प्रमाण १२.२% असतें. युनायटेड नेशन्ससारख्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या बातम्या १९.५% जागा व्यापतात. देशी भाषेंतील वृत्तपत्रांचे बाबतींत तत्सम प्रमाणें १८.३%, १०.७% आणि २५.१% असें आढळतें. वृत्तपत्रांना ह्या सर्व बातम्या पुरविणाऱ्या संस्था ह्या सर्व परदेशी नियंत्रणाखालील आहेत. वास्तविक, हिंदी पत्रकार व हिंदी वृत्तसंस्था ह्यांच्यावरच आपण विश्वास ठेवूं शकतों. परकीयानें पुरविलेल्या बातम्या त्याच्या दृष्टीकोनांतूनच दिलेल्या असणार, हें उघड आहे. हिंदी दृष्टीकोनाचा अभाव आणि हिंदी आकांक्षांचें अज्ञान, ह्या संबंधांत अतिशय तीव्रतेनें जाणवतें. भारताच्या शेजारच्या राष्ट्रांबाबत भारतीय वृत्तपत्रांत कितीतरी जास्त बातम्या प्रसिद्ध व्हावयास हव्यात; पण चीन, बर्मा, सयाम, जपान, इंडोचायना, इंडोनेशिया, जावा, फिजी, मलाया, बोर्नियो, पाकिस्तान, नेपाळ, सिलोन, तिबेट, मध्यपूर्वेतील देश, ह्या देशांशीं भारताचे हितसंबंध निगडित असूनहि त्या देशांतील घडामोडींचें ज्ञान येथें प्रसृत होऊं शकत नाहीं. ह्या देशांतून ज्या बातम्या येतात त्या साम्राज्यवादी दृष्टिकोनाच्या असतात, अशीच सर्वसाधारण समजूत आहे. आग्नेय आशिया, मध्यपूर्व आणि अतिपूर्व येथील घडामोडींच्या बातम्या हिंदी वृत्तपत्रांचे संपादकांना हव्याशा वाटतात, परंतु हिंदी वृत्तपत्रांचे ह्या विभागांत फारच थोडे प्रतिनिधी आहेत. इं. प्रे. इन्स्टिटयूटनें २४ हिंदी वृत्तपत्रांकडे ह्याबाबत चौकशी केली, त्यांपैकीं फक्त तिघांचेच कोलंबो, सिंगापूर आणि रंगून अशा ठिकाणीं बातमीदार होते. सोव्हिअट युनियनमधून बातम्या मिळणें दुरापास्त झालें, तर मग त्यांत नवल नाहीं.

भारतांतील वृत्तपत्रांच्या वाचकांना पुरविल्या जाणाऱ्या परदेशीय बातम्यांचें स्वरूप वरील प्रकारचें आहे. स्थानिक व स्वदेशी बातम्यांचें महत्त्व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुष्कळच वाढलें असलें, तरी त्या प्रमाणांत बातम्यांचें संकलन व पुरवठा ह्यांत सुधारणा झालेली नाहीं. मराठी वृत्तपत्रापुरता विचार केला, तर त्यांना ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिसेस किंवा युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिसकडून शिजवून तयार केलेल्या बातम्या, लेख व चित्रें प्रसिद्ध करणें सोईचें वाटतें; त्यासाठी त्यांना खर्च पडत नाहीं ह्याचा परिणाम, कित्येक वृत्तपत्रें अमेरिकन व ब्रिटिश विचारांचे व प्रगतीचे न कळत भाट बनले आहेत. ह्या बातम्यांत प्रचाराचाहि भाग असतो, हें विसरून कसें चालेल? आर्थिक दौर्बल्याचा तो परिणाम आहे, परंतु त्यामुळें वाचकांना राष्ट्रीय दृष्टिकोनास मुकावें लागते, त्याची वाट काय? अशा बातम्यांचा व लेखांचा भरणाहि एकूण मजकुराच्या मानानें बराच मोठा असतो. वृत्तपत्रांच्या मालकांच्या धोरणानुसार त्यांत लेख व मजकूर येणें क्रमप्राप्तच असतें; परंतु हिंदी वृत्तपत्रांतील फार मोठी जागा परदेशांतून खुबीनें प्रसृत केलेल्या बातम्यांनीं व मजकुरानें घ्यावी, ही बाब चिंतनीय आहे.

---

## कापड–गिरण्यांच्या धंद्याची शताब्दि

### १०० वर्षांतील प्रगति

भारतांतील कापड गिरण्यांची शताब्दि १९५४ सालीं साजरी होईल. १८५४ सालीं श्री. कावसजी नानाभाई दावर यांनीं भारतांतील पहिली कापड गिरणी मुंबईत सुरू केली. आज या उद्योगाचा व्याप भारताच्या कित्येक मोठ्या शहरांत वाढला असून, या उद्योगांत सध्या १०४ कोटी रु. चें भांडवल गुंतलेलें आहे. भारतांत आजमितीला एकूण ४५३ गिरण्या असून त्यांत १,५४,२७,०३४ साचे व २,०३,७८६ माग चालू आहेत. या गिरण्यांत दरवर्षी सुमारें १२१ कोटी रु. चा ३० लाख गाठी कापूस वापरला जातो. या गिरण्यांतून दरवर्षी जितकें सूत तयार होतें, त्या सुतानें साऱ्या पृथ्वीस ६ लाख वेळां गुंडाळतां येईल.

१९४८ ते १९५२ चे दरम्यान भारतांतून ५८ कोटी रु. किंमतीचें ६७ कोटी वार कापड निर्यात झालें. संख्येच्या दृष्टीनें पाहतां मुंबई राज्यांत सर्वांत जास्त म्हणजे २०० गिरण्या असून पैकी खुद्द मुंबईत ६५, अहमदाबाद मध्यें ७४ व बाकी ठिकाणीं ६१ गिरण्या आहेत. यानंतर मद्रास राज्याचा नंबर असून तेथें एकूण ९० गिरण्या आहेत. भारतांतील कापड गिरण्यांत एकूण ७ लाख, ४२ हजार कामगार असल्याचें समजतें.

---

**मध्यभारतामधील विडी ओढणारे**—मध्यभारतांत विड्या वळणारे कारखाने एकूण २५ असून त्यांचें दर वर्षाचें उत्पन्न १,००,००,००,००० विड्या आहे. एकूण उत्पादनाच्या ५० टक्के उत्पादन गुणा जिल्ह्यांत होतें. दोन तृतियांश उत्पादन स्थानिक बाजारांत खपतें आणि बाकीचें निर्यात केलें जातें.

## मुंबई को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी, लि.

### आतांपर्यंतच्या कार्याचा आढावा

मुंबई को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीची स्थापना होऊन गेल्या जुलैंत एक वर्ष पुरें झालें असून तिनें दुसऱ्या वर्षांत पदार्पण केलें आहे. या एका वर्षांत सदरहू सोसायटीनें भांडवल-रूपानें ६४ लाखांवर रुपये गोळा केले असून राज्यांतील २१ सहकारी संस्थांना एकूण सुमारें ५५,१६००० रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत.

सहकारी संस्थांना दीर्घ मुदतीचीं कर्जें देतां यावीं म्हणून सदरहू सोसायटी मुंबई सहकारी संस्थांसंबंधीच्या कायद्याखालीं नोंदविण्यांत आली असून तिनें पहिल्या वर्षांत शेअर भांडवल म्हणून ६३,२१,००० रुपये गोळा केले आहेत. सोसायटीचें अधिकृत भांडवल एक कोटी रुपये असून त्यांतील सरकारचा वांटा २१,४२,००० रुपये आहे. उरलेली रक्कम विमा कंपन्या, बँका, सहकारी संस्था आणि इतर संस्थांकडून जमविण्यांत आली आहे.

पहिल्या वर्षांत सदरहू सोसायटीनें स्वतःचें भांडवल वाढविण्याच्या कार्यावर व सहकारी घरबांधकाम संस्थांना कोणत्या अटींवर कर्जें यावयाचीं त्या अटी ठरविण्याच्या कामावर भर दिला होता.

या वर्षी राज्याच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतील २८ सहकारी घरबांधकाम संस्थांकडून सदरहू सोसायटीकडे कर्जासाठीं अर्ज आले. या सर्व सोसायट्यांनीं मिळून एकूण १,०२,११,३९५ रुपये कर्जाची मागणी केली होती.

सदरहू अर्जांची छाननी करण्यासाठीं एक पोटसमिति नेमण्यांत आली होती. या समितीनें आलेल्या अर्जांची छाननी करून कर्ज देण्यासाठीं १९ अर्जांची शिफारस केली. तथापि, सोसायटीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांनीं व कार्यकारी समितीनें १३ अर्जदारांना मिळून एकूण ३४,८८,००० रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं.

तथापि कांहीं कायदेशीर व तांत्रिक बाबींसंबंधीची पाहणी पुरी न झाल्यामुळें यावर्षी सदरहू सोसायटीला कोणत्याहि हौसिंग सोसायटीस प्रत्यक्ष कर्ज देतां आलें नाहीं, म्हणून सोसायटीनें आपली सर्व रकम मुंबई राज्य सहकारी बँकेंत फिक्स्ड डिपॉझिट म्हणून ठेवली आहे. अशा रीतीनें या रकमेवर येणाऱ्या व्याजांतून सोसायटीला नोकरवर्गासाठीं वगैरे १७,००० रुपये खर्च करावा लागला व हा खर्च वजा जातां ४३,००० रुपये शिल्लक राहिले. या रकमेपैकीं ११,००० रुपये गंगाजळींत ठेवण्यांत आले.

सोसायटीच्या शेअरवर किमान ३ टक्के डिव्हिडंड देण्याची हमी देण्यांत आली असल्यामुळें त्यासाठीं ७३,००० रुपयांची आवश्यकता होती. अशा रीतीनें सोसायटीला सुमारें ४१,००० रुपये कमी पडले. ही रक्कम राज्य सरकारकडून देण्यांत यावयाची आहे.

सोसायटीचें शेअर भांडवल (दुसऱ्या वर्षांत) ६४,५८,७५० रुपयांवर गेलें असून तिनें आणखी आठ संस्थांना एकूण २०,२८,००० रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं आहेत. सात संस्थांना कर्जाच्या रकमा प्रत्यक्ष देण्यांत आल्या आहेत.

सोसायटीला स्थैर्य येण्याच्या दृष्टीनें मुंबई सरकारनें सध्याच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांची मुदत एक वर्ष वाढविण्याचें ठरविलें आहे.

बोर्डावरील एका रिकाम्या झालेल्या जागेवर अहमदाबाद कॉर्पोरेशनचे मेयर श्री. चिनुभाई चिमणभाई यांची डायरेक्टर म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.

## कण आणि क्षण

### सुखी जीवनाच्या पाउलवाटा

(ले. श्री. वा. काळे, बी. ए., संपादक 'अर्थ', दुर्गाधिवास पुणें ४, किं. रु. २॥)

सूक्ष्म निरीक्षण करणारा प्रतिभावान् लेखक केवळ लघुकथा वा कादंबऱ्याच उत्तम रीतीनें लिहील असें नाहीं; तर इतर रीतीनेंहि आपला कलाविकास व्यक्त करूं शकेल याचा 'कण आणि क्षण' हें पुस्तक एक उत्तम नमुना आहे. व्यवहारांत आपणास पदोपदीं असणाऱ्या अडचणी, माणसा-माणसांतील अगर स्त्री पुरुषांच्या परस्परविषयक वागणुकींतील विसंगति व थोड्याशा विचारांतीं सर्व प्रयत्नांनीं साध्य होणारे सुखी जीवनाचे मार्ग यांचें या पुस्तकांत लेखकानें मोजकीं निरनिराळीं रोजच्या व्यवहारांतील उदाहरणें देऊन उत्तम दिग्दर्शन केलें आहे व त्यामुळें हें पुस्तक कादंबरीइतकेंच मनोरंजक व शिवाय बोधप्रद झालें आहे. आपल्या नेहमींच्या सुखाच्या कल्पना पैशाच्या श्रीमंतीवर आधारलेल्या असतात; परंतु मानवी जीवनांत सुख निर्माण करण्याचें सामर्थ्य सुंदर व मधुर सामाजिक वातावरणांतहि निःसंशय आहे, ही गोष्ट या पुस्तकाच्या वाचनावरून आपणास कळून येते. रोजच्या व्यवहारांत आपल्या वागणुकीनें दुसऱ्याला सुख कसें मिळेल, याची आपण काळजी करूं लागलों, अनेक बारीकसारीक गोष्टींतहि योजनाबद्ध रीतीनें वागूं लागलों व समंजसपणानें आपल्या वर्तनांत व आचारांत आकर्षकता आणूं लागलों तर असें सुमधुर सामाजिक वातावरण सहज तयार होईल व त्यामुळें त्या माणसाबरोबरच त्याच्या कक्षेंतील इतरांनाही आपल्या जीवनांतील माधुरी चाखतां येईल. असें सुंदर सामाजिक वातावरण निर्माण करण्याचे व व्यवहारचातुर्याचे अनेक धडे श्री. काळे यांनीं या पुस्तकांत दिलेले असून आपल्या सहजसुंदर भाषाशैलीच्या द्वारां व मधूनमधून उत्पन्न होत असलेल्या नर्म विनोदाच्या लहरीबरोबर आपल्या अंतःकरणांत सहज शिरतील अशी लेखनाची मांडणी केली आहे. सध्यांच्या विस्कळित होत चाललेल्या सामाजिक रचनेंतहि आपलें कौटुंबिक जीवन सुखावह कसें करतां येईल, याचें मार्मिक विवेचन या पुस्तकांत निरनिराळे हरप्रसंगीचे अनेक दाखले देऊन त्यांनीं केलें असल्यानें प्रत्येक कुटुंबास हा ग्रंथ संग्रहणीय वाटेल यांत शंका नाहीं."

—"ज्ञानेश्वर", ४ डिसेंबर १९५३

---

### प्राप्तिकर चौकशी मंडळाची मुदत दोन वर्षांनीं वाढविली

भारत सरकारनें प्राप्तिकर चौकशी मंडळाची मुदत आणखी दोन वर्षें म्हणजे ३१ डिसेंबर, १९५५ पर्यंत वाढविण्याचें ठरविलें आहे. मध्यवर्ती सरकारनें सोंपविलेल्या कर चुकविण्याच्या कांहीं खास प्रकरणांची, तसेंच इतर गोष्टींची, चौकशी करण्यासाठीं म्हणून १९४७ च्या टॅक्सेशन इन् इन्कम (इन्व्हेस्टिगेशन कमिशन) ॲक्टानुसार या मंडळाची स्थापना झाली आहे. हें मंडळ अस्तित्वांत येऊन आतां सुमारें ६ वर्षें झालीं असून त्याची मुदत ३१ डिसेंबर, १९५३ ला संपते. या मंडळाकडे असलेलीं अनेक प्रकरणें निकालांत काढण्यास आणखी दोन वर्षें लागण्याची अपेक्षा असल्यानें त्याच्या मुदतींत वाढ करणें आवश्यक झालें आहे.

## अन्नाचें उत्पादन वाढलें, पण ?

जगांतील भुकेल्या लोकांना अन्नाचा पुरवठा करण्यासाठी शेतकीचा विकास करण्याच्या सूचना संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या शेती-संघटनेनें पुन्हां एकदां दिल्या आहेत. ह्या संघटनेचे सध्यां ७१ सभासद आहेत. ज्या देशांतून अन्नधान्याचें उत्पादन गरजेपेक्षा जास्त होत आहे, त्यांनीं आपल्या जवळचा माल अतिशय पडत्या भावानें परदेशीं पाठवूं नये, असाही इशारा देण्यांत आला आहे. असें केलें तर जगांतील अन्न-धान्याचें उत्पादन आणि व्यापार विस्काळित होईल, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. शेतकी संघटनेचें हें अधिवेशन रोम येथें भरलें होतें व तें तीन आठवडे चाललें होतें. निरनिराळ्या देशांचे मिळून ५०० प्रतिनिधी अधिवेशनाला हजर होते, व सर्वांनीं धोरण म्हणून वरील दोन बाबींवर जोर दिला असें समजतें. संघटनेला असें आढळून आलें कीं, जगांतील अन्नाचें उत्पादन युद्धपूर्व काळापेक्षा २३ टक्क्यांनीं अधिक आहे आणि पहिल्या प्रथमच जगांतील वाढत्या लोकसंख्येशीं त्याचा मेळ बसत आहे. तथापि हें चित्र सर्वसाधारणपणेंच खरें आहे. अन्नाच्या वाढत्या उत्पादनापैकीं जवळ जवळ अर्धे उत्पन्न उत्तर अमेरिकेंत वाढलेलें आहे. अतिपूर्वेकडील देशांत अन्नाचें उत्पादन युद्धपूर्व कालापेक्षा फारसें वाढलेलें नाहीं. उत्तर अमेरिकेंत जगांतील लोकसंख्येपैकी ७ टक्केच लोक आहेत, पण त्याचें शेतीचें उत्पादन मात्र जगाच्या शेतीच्या उत्पादनाच्या २० टक्के आहे. अतिपूर्वेकडील देशांत जगाची अर्धी लोकसंख्या आहे, पण शेतीचें उत्पादन मात्र जगाच्या उत्पादनाच्या एक चतुर्थांशच आहे.

---

## उत्तर-प्रदेशामधील माशांची पैदास

उत्तर-प्रदेश सरकारनें माशांची पैदास वाढविण्याचें शिक्षण खेडेगांवांतील लोकांना देण्यासाठी १३ केंद्रें उघडलीं आहेत. ह्या केंद्रांतून माशांची जोपासना व संवर्धन ह्यांचीं प्रात्यक्षिकेंच लोकांना करून दाखविण्यांत येणार आहेत. राज्यांतील मच्छीमारीच्या धंद्याची पाहणी केल्यावर हीं केंद्रें निवडण्यांत आलीं असून पावसाळ्यांत पाण्यानें दुथडी भरून वाहणाऱ्या ओढ्यांतील कांहीं सोयीच्या जागा प्रयोगासाठी निवडण्यांत आल्या आहेत. उत्तर-प्रदेशांत जमीनदारी रद्द झाल्यापासून ह्या धंद्याला राज्याच्या अर्थव्यवस्थेंत विशेष स्थान प्राप्त झालें आहे. सरकारनें असें ठरविलें आहे कीं राज्यांतील छोटीं तळीं मच्छीमारी खात्याकडे सोंपविण्यांत यावी. तीन एकराहून अधिक क्षेत्रफळ असणारीं तळीं ह्या खात्याकडे कायमचीच राहाणार आहेत. छोटीं तळीं मात्र गांवपंचायतींना देण्यांत यावयाचीं आहेत. छोट्या तळ्यांतून माशांची वाढ करण्यासाठी प्रथम जे मासे लागतील ते सरकार नाममात्र किंमतीला पुरविणार आहे. मच्छीमारीविषयीं संशोधन करणारें एक केंद्र लखनौ येथें कार्य करीत आहे. माशांची पैदास कोणत्या भौगोलिक परिस्थितींत चांगली होते त्यासंबंधीं संशोधन करण्यांत येत आहे. संशोधन केंद्रानें गोड्या पाण्यांत राहणाऱ्या माशांचे विविध प्रकार सर्व राज्यांतून जमा केले आहेत. सुमारें ११८ विविध प्रकारचे मासे आतां केंद्रांत पहावयास मिळतात. त्यांची एक सूचीहि तयार करण्यांत आली आहे. पाण्याच्या किती क्षेत्रफळांत किती मासे पैदाशीसाठी ठेवावे, त्यांना अन्न कोणतें द्यावें, इत्यादि अनेक बाबतींत संशोधन करण्यांत येत आहे.

## कच्च्या साखरेच्या आयातीचें स्वागत

भारतीय सरकारनें २,००,००० टन कच्ची साखर आयात करून ती शुद्ध करण्यासाठी देशी कारखान्यांना देण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याचें स्वागत कानपूर येथील साखरेच्या व्यापारी संघानें केलें आहे. संघाचे अध्यक्ष श्री. रामचंद्र भारती ह्यासंबंधीं म्हणतात कीं, भारत सरकारनें कच्ची साखर आयात करण्याचें ठरविलें ही फार चांगली गोष्ट आहे. अशा प्रकारची साखर आयात केल्यानें देशाचा बराच पैसा तर वाचेलच, पण आणखीहि एक फायदा होईल. साखरकारखान्यांतील कामगार हा हंगामाव्यतिरिक्त बहुधा रिकामाच असतो. कच्ची साखर शुद्ध करण्याचें अधिक काम कारखान्यांना मिळाल्यामुळें साखरकारखान्यांतील कामगारांनाहि अधिक काम मिळण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. ह्याविषयीं सरकारला एक सूचना करावीशी वाटते. शुद्ध केलेली साखर ही सध्यां बाजारांत असलेल्या साखरेपेक्षा बरीच स्वस्त असेल; तेव्हां त्या साखरेच्या विक्रीवर वाजवी नफा घेऊं दिल्यानंतर जी रक्कम उरेल तिचा उपयोग ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितासाठी केला जावा. भारतामधील साखरेच्या धंद्याची सध्यांची परिस्थिति अशी आहे कीं ३,००,००० टन साखरेची नेहमींच टंचाई भासणार. तेव्हां ४,००,००० टन कच्ची साखर चालू हंगामांत आयात करण्यास कांहींच हरकत नसावी. अशी आयात केल्यानें साखरेचा भाव चढण्याचा संभव बराच कमी होईल आणि साखरेच्या कारखान्यांतील हंगामी कामगारांना अधिक कामहि मिळेल. श्री. भारतीय ह्यांनीं साखर-व्यापाऱ्यांचा दृष्टिकोन मांडला आहे. पण भारतीय साखर कारखानदारांचें म्हणणेंहि समजून घेणें अवश्य आहे.

---

## विद्यार्थ्यांचा शोचनीय आहार

कलकत्ता विद्यापीठाच्या स्टूडंट्स् वेलफेअर कमिटीनें जानेवारी १९५१ ते डिसेंबर १९५२ ह्या कालांत कॉलेजमधील व शाळांमधील ५,६५० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करवून घेतली. ह्या विद्यार्थ्यांपैकी ३३ टक्के विद्यार्थ्यांचा आहार आरोग्याला पुरेसा अगर पोषक नव्हता असें कमिटीला आढळून आलें. १९४८–५० सालाच्या मानानें मात्र वाईट आहार घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत घट झालेली आढळून आली. त्याचप्रमाणें, ज्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचाराची अगर मदतीची तात्बडतोब गरज होती अशांची संख्याहि कमी झालेली आढळून आली. अशा विद्यार्थ्यांची टक्केवारी १९५१–५२ मध्यें ३७ टक्के होती; तीच १९५० मध्यें ५५ टक्के होती. तथापि, कमी झालेल्या टक्केवारीचें कारण आहार सुधारला हें मात्र नव्हतें. घशांतील गांठी सुजणें अगर घसा मोकळा नसणें अशा किरकोळ तक्रारी असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यानें तात्बडतोब वैद्यकीय उपचार पाहिजे असलेल्यांची संख्या घटली, असें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे. विद्यार्थी वर्गांत दृष्टिदोषांचें प्रमाण फार आढळून आलें. पहिल्या कालखंडांत अशा विद्यार्थ्यांची टक्केवारी २८·१ इतकी होती, तीं दुसऱ्या कालखंडांत १७·४ इतकी झाली. तपासणी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १ ते ५ टक्के विद्यार्थी वाईट दातांच्या, घशाच्या अगर कातडीच्या रोगानें ग्रस्त असे होते. फुफ्फुसाच्या विकारानें पछाडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र १ टक्का सुद्धां नव्हती. ८ ते २१ वर्षें वयाच्या बंगाली विद्यार्थ्यांच्या रक्तदाबाचाहि अभ्यास अहवालांत केला आहे. विद्यार्थ्यांची ही तपासणी शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. शिवाय, विमा-कंपन्यांनाहि तिचा उपयोग होण्यासारखा आहे.

## पंजाबमधील सहकारी संस्था

### पाकिस्तानी शिष्टमंडळाचें आगमन

पाकिस्तानी पंजाबच्या सहकारी सोसायट्यांच्या रजिस्ट्रारचे नेतृत्त्वाखाली ४० जणांचें एक शिष्टमंडळ अमृतसर येथें येऊन दाखल झालें आहे. पाकिस्तानांत समाविष्ट झालेल्या सहकारी संस्थांकडून भारताला ७० लक्ष रुपये येणें आहे. भारतीय पंजाबमधील सहकारी बँकांच्या लाहोर येथील सें. को. बँकांत ठेवी होत्या. दोन वर्षांपूर्वी वाटाघाटी झाल्या, तेव्हां पाकिस्तानी पंजाबानें त्याचे रिझर्व्ह बँकेंतील १½ कोटी रु. भारतास देण्याचें मान्य केलें. परंतु, ही रक्कम अद्याप भारताच्या हातीं आलेली नाहीं, आणि पाकिस्तानी पंजाब व भारतीय पंजाब ह्यांचे हिशेब पुरे झालेले नाहींत. आतां आलेलें पाकिस्तानी शिष्टमंडळ व भारतीय पंजाबचें शिष्टमंडळ ह्यांचेमधील चर्चा हिशेब पुरा करील, अशी अपेक्षा आहे. होशारपूर येथें दोन्हीं शिष्टमंडळें एकत्र जमलीं आहेत.

---

## आणखी २,००० प्राथमिक शिक्षकांची भरती

### शाळा नसलेल्या गांवांत शाळा सुरू करण्यांत येणार

सुशिक्षितांमधील बेकारी कमी करण्याच्या दृष्टीनें भारत सरकारच्या सहकार्यानें मुंबई सरकारनें सुरू केलेल्या मोहिमेचा एक भाग म्हणून मुंबई राज्यांत ग्रामीण भागासाठी आणखी २,००० प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करण्यांत येणार आहे. जेथें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें आहे अशा भागांतील ज्या शाळांत कमी शिक्षक आहेत त्या शाळांसाठी २,००० शिक्षकांची भरती करण्याचें कांहीं दिवसांपूर्वी जाहीर करण्यांत आलें होतें. त्याशिवाय उपरोक्त २,००० जादा शिक्षकांची भरती करण्यांत येणार आहे.

ता. १ डिसेंबर पासून, ७०० किंवा अधिक लोकवस्तीच्या ज्या गांवांत शाळा नसतील तेथें त्या सुरू करण्याची व्यवस्था करण्यांत येत असून त्यांत जादा शिक्षकांची सोय लावण्यात येईल. या शाळांसाठी सुमारें १,०४० शिक्षक लागतील. उरलेल्या ९६० लोकांना, ७०० पेक्षा कमी पण ५०० हून जास्त लोकवस्तीच्या शाळा नसलेल्या गांवांत एका शिक्षकाच्या शाळा सुरू करून, तेथें नेमण्यांत येईल.

---

### ओसाड गांव

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील एदलाबाद तालुक्यांतील भोड नांवाचें ओसाड गांव १ जानेवारी १९५४ पासून याच तालुक्यांतील ढापे गांवांत समाविष्ट करण्यांत येईल, व त्यास ढापे या नांवानेंच संबोधिण्यांत येईल.

---

**उष्ण झऱ्यांचा औषधी उपयोग**—प. बंगालमधील उष्ण झऱ्यांच्या पाण्यांच्या औषधी उपयोगासाठी शास्त्रीय चौकशी करण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. बीरभूम जिल्ह्यांत सुरीपासून १५ मैलांवर असे बरेच झरे आहेत.

**गिरणींत स्त्रिया व मुलांची भरती**—लँकेशायरमधील कापडाच्या गिरण्यांतून कामें करण्यासाठी हल्लीं आहेत त्यापेक्षा अधिक स्त्रियांची व मुलांची भरती पुढील वर्षीं करण्यांत येणार आहे ह्या धंद्यांतून १०,००० मजूर बाहेर पडल्यामुळें बाहेरून तेवढे कामगार आणण्यांत येणार आहेत.


**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

**वे स्ट र्न इं डि या**

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचीति पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
| --- | --- |
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया लाईफ**

**इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.**

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२

---

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
| --- | --- | --- |
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.

ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.

एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर.

## पुण्यांतील बँकांमधील क्रिकेटचे सामने

पुणें शहरांतील बँकांमधील क्रिकेटच्या सामन्यांचा उपक्रम गेल्या वर्षी सुरू करण्यांत आला. चालू वर्षापासून ह्या सामन्यांची व्यवस्था पूना बँकिंग असोसिएशनकडे सोपविण्यांत आलेली आहे. व्यवस्था कमिटीचे अध्यक्ष इंपीरिअल बँकेचे पुणें शाखेचे एजंट श्री. ए. जे. बॅप्टिस्ट हे आहेत. विजयी टीमला पुरोहित ट्रॉफी, जास्तींत जास्त धावा काढणाराला क्षीरसागर पेला व बोलिंगमध्यें प्राविण्य दाखविणाराला फोडांगे पेला मिळणार आहे. यंदाच्या सामन्यांत नऊ बँकांनीं भाग घेतला आहे. महाराष्ट्र बँकेनें प्रेसिडेन्सी बँकेचा, इंपीरिअल (ब) बँकेनें देना बँकेचा, बँक ऑफ इंडियानें भारत इं. बँकेचा, सेंट्रल बँक ऑफ इंडियानें इंपीरिअल अ) चा आणि 'रेस्ट'नें पना सें. को. बँकेचा पहिल्या दोन फे-यांत पराभव केला.

## पर्किन्स कंपनीच्या मॅ. डायरेक्टरांचें आगमन

एफ. पर्किन्स लि. (पीटरबरो, इंग्लंड) चे मॅनेजिंग डायरेक्टर मि. फ्रँक पर्किन्स हे भारतांत २ जानेवारी रोजीं येणार आहेत. त्यांचा मुक्काम चार आठवडे होईल. पर्किन्स डिझेल इंजनांचें उत्पादन भारतांत करण्याची शक्यता ते अजमावणार आहेत. पीटरबरो येथें बनविलेले सुटे भाग जुळविणारा कारखाना सध्यां मद्रास येथें चालू आहेच; कांहीं सुटे भागहि येथें आतां होऊं लागले आहेत.

## किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनीचें पहिलें डिव्हिडंड

दि किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि. ला. ३० जून, १९५३ अखेर संपलेल्या वर्षी ३·२ लक्ष रु. घसारा काढून व १·२५ लक्ष रु. करासाठी तरतूद करून १·५४ लक्ष रु. निव्वळ नफा उरला. १ लक्ष रु. जनरल रिझर्व्हमध्यें घालण्यांत आले. भागीदारांना ५% डिव्हिडंड मिळणार आहे. विजेचे ट्रॅन्सफॉर्मर्सचें उत्पादन कंपनी हातीं घेणार आहे आणि त्यासाठी तिला इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें १२ लक्ष रुपयांचें कर्ज दिलें आहे. आवश्यक ती यंत्रसामुग्री लवकरच दाखल होऊन १९५४ मध्यें प्रत्यक्ष उत्पादन सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

## बर्माला हिंदी इंजिनिअर हवेत

बर्मामधील जलविद्युत् योजनांसाठी २०० हिंदी इंजिनिअर्स मिळविण्याची बर्मा सरकारची खटपट चालू आहे. एक ब्रह्मी शिष्टमंडळ त्यासाठी येथें आलें आहे. एकूण ३,००० अर्जदारांपैकीं १०० जणांना मुंबई येथें मुलाखतीसाठी बोलाविलें आहे. तेथून शिष्टमंडळ बंगलोर, मद्रास, कोइमतूर व कलकत्ता येथें जाईल. बर्मीत फक्त एकच इंजिनिअरिंग कॉलेज आहे.

## आसाममधील सहकारी बँकांस रिझर्व्ह बँकेचें कर्ज

आसाम को. अपेक्स बँक लि. ला रिझर्व्ह बँकेनें २० लक्ष रु. कर्ज मंजूर केलें आहे. सहकारी पतपेढ्यांना अल्प मुदतीचीं कर्जे देण्यासाठीं व पीक कर्जासाठीं त्याचा विनियोग केला जाईल. आसाम राज्य सरकारनें रिझर्व्ह बँकेस परतफेडीची हमी दिली आहे.

## कच्छच्या रणांत शेती ?

कच्छच्या रणांत शेती करण्याची शक्यता अजमावण्याकरितां भारत सरकारनें एक योजना मंजूर केली आहे. पहाणीचें काम लवकरच सुरू होईल.

## ४३६ पृष्ठांचें, अडीच शेर वजनाचें वृत्तपत्र

फोटो एनग्रेव्हर्सच्या संपामुळें न्यूयॉर्कमधील वृत्तपत्रें ११ दिवस बंद होतीं. त्यामुळें, शिल्लक राहिलेल्या जाहिराती व मजकूर छापण्यासाठीं वृत्तपत्रांनीं मोठाले अंक प्रसिद्ध केले. न्यूयॉर्क टाइम्सचा १३ तारखेचा अंक ४३६ पृष्ठांचा होता व त्याचें वजन अडीच शेर भरलें. त्यासाठीं ३,३०० टन कागद लागला, त्याकरितां ४०० एकर जंगल तोडावें लागलें असेल.

## हॉटेलच्या मेनु कार्डावरील उपदेश

ताजमहाल हॉटेलच्या सुवर्ण ज्युबिलीचे प्रसंगीं भाषण करतांना ताजमहाल होटेलच्या मालक-कंपनीचे चेअरमन, सर होमी मोदी, ह्यांनीं एका अमेरिकन होटेलच्या मेनुकार्डावर छापलेल्या सूचनेचा उल्लेख केला व ती सूचना अंमलांत आणण्याचा सर्वांना सल्ला दिला. ती सूचना अशी:—"तुमच्या पत्नीला स्वैंपाक करतां येत नसेल, तर तिच्याशीं काडीमोड करूं नका. येथें जेवा आणि तिला आवडतें पाळीव प्राणी म्हणून माना."

## "सर" ची जागा "भारत रत्न" घेणार

भारत सरकार कांहीं पदव्या दरसाल देणार आहे. ह्या पदव्या नांवांच्या आधीं जोडल्या जातील. "भारत रत्न" ही पदवी दरसाल जास्तींत जास्त चौघांना दिली जाईल. "पद्मविभूषण"चे तीन वर्ग रहातील.

## रिझर्व्ह बँकेची मद्रास येथील आठ मजली इमारत

रिझर्व्ह बँकेच्या मद्रास कचेरीच्या इमारतीसाठीं जागा अगोदरच योजलेली होती. तेथें १ कोटी रुपये खर्चून आठ मजली इमारत बांधण्याचें आतां ठरलें आहे. १८ महिन्यांत बांधकाम पुरें होईल.

## भारतांत पाकिस्तानांतून दररोज २००० तोळे सोनें आयात

१०० पाकिस्तानी रुपये = १४४ हिंदी रुपये असा सरकारी हुंडणावळीचा दर आहे, तरी अनारकली येथें १२० पाकिस्तानी रुपयास १०० हिंदी रुपये असा दर चालू आहे, अशी लाहोरची वार्ता आहे. स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें गुप्त पोलीस खात्यास ह्याबाबत चौकशी करण्यास सांगितलें आहे. पूर्व व पश्चिम पंजाब ह्यांचेमध्यें रस्त्यानें ये-जा सुरू झाली आहे. पाकिस्तानी पासपोर्टवाल्यांना बरोबर फक्त १० रुपये नेण्याची परवानगी आहे. प्रवासाला एवढी रक्कम पुरत नाहीं, म्हणून पाकिस्तानांतून येणारे प्रवासी बरोबर सोन्याचे दागिने भारतांत आणतात आणि सरहद्द ओलांडल्याबरोबर ते विकून टाकतात. अशा रीतीनें, दररोज सुमारें २,००० तोळे सोनें भारतांत आयात होतें असा अंदाज आहे. वास्तविक, पाकिस्तानांत भारतापेक्षा दर तोळयास १० रुपयांनीं सोनें महाग आहे.

**वऱ्हाडमधील पतीच्या संस्था**—वऱ्हाड को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या प्रयत्नाला चांगलें यश आल्याचें दिसतें. वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांतून आतां २,५०० पतीच्या सहकारी संस्था काम करीत आहेत. वऱ्हाडमधील तीनचतुर्थांश खेड्यांतून अशा संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यांची सभासदसंख्या १९५१ सालीं ५२,५८४ होती, ती आतां ६४,२१५ पर्यंत वाढली आहे. इन्स्टिट्यूटचें वार्षिक अंदाजपत्रक ६०,००० रुपयांचें आहे.

"अहाहा काय तो माझा उज्ज्वल भविष्यकाळ — हीं पांच वर्षे मला किती उमेदीची वाटतात !
या नदीवर प्रचंड पोलाद व कॉंक्रिटची उंच भिंत उभारली जात आहे··· ते धरण बांधीत आहेत
त्यानें माझ्या तसेंच पलीकडील सर्व शेतांनाहि पाणी पुरवठा होईल. यापुढें मला
पर्जन्यराजाच्या कृपेवर अवलंबून राहावे लागणार नाहीं !"

हें साध्या भोळ्या शेतकऱ्याच्या तोंडचे उतावळे उद्गार राष्ट्राच्या इच्छेचे प्रतीक आहेत.
भारताच्या या दरिद्री प्रदेशाचे समृद्ध जमिनींत रूपांतर करण्यासाठीं पंचवार्षिक योजना
शेतकी सुधारणेकरितां ७९५ कोटी रुपयांची तरतूद करते आहे. देशाच्या या प्रचंड पुनर्रचनेच्या
कामांत जमिनीची मशागत करणाऱ्याचे साहाय्य महत्वाचे ठरेल.
खरोखर, याच माणसांच्या
हातीं भारताचें भवितव्य आहे.

## तें उत्तम पीकाची निपज करतील

भिन्न प्रकारच्या योजना अमलांत आणण्यासाठीं हजारों टन पोलाद उपयोगांत आणले जाईल. आणि म्हणून सिरनिराळ्या महत्वपूर्ण प्रकारांनी पोलाद आपल्या राष्ट्राला व जनतेला उन्नत, बराच आशादायक भविष्यकाळ दाखवील.

दी टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड



हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.